बीड । शनिवार
१०.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ३९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 






## ...तर तात्काळ गुन्हे दाखल करा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला सुरक्षेचा आढावा, दिले महत्त्वाचे आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत पाकिस्तानमध्ये सध्या तणावपूर्ण परिस्थिती पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर सध्या भारतातील सर्व राज्यांना हाय अलर्ट देण्यात आला आहे. सध्या जम्मू काश्मीर, पंजाब, गुजरात, महाराष्ट्र यांसारख्या जिल्ह्यात चोख सुरक्षाव्यवस्था ठेवण्यात येत आहे. भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी, असे आदेश दिले आहे. तसेच देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिंग ऑपरेशन करा, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश- प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा. केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.

प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा. प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही म हत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा.

एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही ▶ उर्वरित पान २ वर

## वारकरी संप्रदाय हा संत परंपरा जपणारा व समाजाला दिशा देणारा असतो: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### तारकेश्वर गड येथील नारायण महाराज पुण्यतिथी उत्सवाच्या कार्यक्रमात उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय ना. एकनाथजी शिंदे शुक्रवार दि. ०९ मे रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर होते. श्री. तारकेश्वर गडावर पू. नारायण महाराज पुण्यतिथी उत्सवात त्यांची विशेष उपस्थिती होती. यानिमित्ताने उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय ना. एकनाथजी शिंदे साहेबांचे बीडमध्ये जल्लोषात स्वागत करत त्यांचा हृदयसत्कार केला. उपमुख्यमंत्री शिंदे साहेबांनी या धार्मिक कार्यात उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. याबरोबरच त्यांनी संत परंपरा जपणारा वारकरी हा समाजाचे प्रबोधन करून, समाजाला दिशा देतो असे त्यांनी उपस्थितांना संबोधित करत अध्यात्माचे महत्त्व समजावले. श्री क्षेत्र तारकेश्वर गड म्हणजे राज्याला तारणाऱ्या संतांची भूमी आहे.





▶ उर्वरित पान २ वर



*बीडः चिरंजीव पंकज गायकवाड पाटील व चि.सौ.का.ज्योती रांजवण यांच्या विवाह प्रसंगी शुभेच्छा देताना समाज कल्याण अधिकारी अंकुश नखाते, दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे दीपक घुमरे, पिंटू कर्डुले, दीपक डोईफोडे, पोलिस काळे सर, रोहन काळे, अ‍ॅड. गायकवाड आदी मान्यवर उपस्थितीत होते.*

## पाकिस्तानच्या गोळीबारात काही भारतीय जवान शहीद; लष्करी अधिकाऱ्यांनी दिली माहिती

**नवी दिल्ली**

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानी सैन्याने काल रात्री भारतातील काही ठिकाणांवर ३०० ते ४०० ड्रोनच्या माध्यमातून अयशस्वी हल्ले केले होते. यामध्ये भारताने पाकिस्तानचे हे सर्व हल्ले परतावून लावले आहेत. मात्र, पाकिस्तानी सैन्याकडून करण्यात आलेल्या गोळीबारात काही भारतीय जवान शहीद झाले आहे. याबाबत सरकारने आज पत्रकार परिषदेत माहिती दिली. विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानमधील चार हवाई संरक्षण स्थळांवर सशस्त्र ड्रोन डागण्यात आले होते. त्यापैकी एक ड्रोन एडी रडार नष्ट करण्यात यशस्वी झाला. पाकिस्तानने हेवी- कॅलिबर तोफखाना आणि सशस्त्र ड्रोन वापरून नियंत्रण रेषेवर तोफगोळ्यांचा मारा केला. याचबरोबर भारताने ▶ उर्वरित पान २ वर



## भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा स्वामी समर्थांचा मंत्र ऊर्जा देणारा, आधार देणारा: माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**केज । प्रतिनिधी**

अक्कलकोट स्वामी महाराजांच्या प्रमुख मठापैकी एक महत्त्वाचा सांप्रदायिक मठ असा नावलौकिक असलेला केज येथील समर्थ मठ असून भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा समर्थांचा मंत्र माणसाला ऊर्जा देणारा आधार देणारा असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



केज येथे श्री स्वामी समर्थ मठ संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट देऊन स्वामी समर्थांच्या पादुकांचे दर्शन घेतले तसेच यावेळी सुरू ▶ उर्वरित पान २ वर



## पुरंदरला परप्रांतीय झाले उदंड; खबरदारी घेणे गरजेचे

**परिंचे । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात सासवड, जेजुरी, निरा यासह माळशिरस, वाघापूर चौफुला, चांबळी, भिवरी, दिवे, गराडे ते अगदी पांगारे, परिंचे, वीरपर्यंत परप्रांतीयांची घुसखोरी वाढली आहे. हे सर्वजण कोणतेही भाडेकरार न करता बेकायदेशीरपणे वास्तव्य करत आहेत. त्यातूनच गुन्हेगारी वाढू लागली आहे. यावर आळा बसणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

पुरंदर तालुक्यातील गावखेड्यांपासून वाड्या-वस्त्यांपर्यंत परप्रांतीय राजरोसपणे व्यवसाय, रोजगाराच्या निमित्ताने कुठलीही ओळख न दाखवता, भाडेकरार न करता घरमालकांना जास्त भाड्याचे आमिष देत राहत आहेत. अनेक घरमालकही डिपॉजिट आणि भाडे जास्त मिळाल्यामुळे या परप्रांतीयांची जास्त चौकशी न करता आपले फ्लॅट, खोल्या तसेच गाळे भाड्याने देत आहेत. यामध्ये सुतारकाम करणारे, गवंडीकाम करणारे, फॅब्रिकेशनची कामे करणारे, तसेच पडेल ते आणि मिळेल ते काम करणारा मजूरवर्ग मोठ्या प्रमाणात ग्रुपने खोल्यांमध्ये राहत आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, कर्नाटक ते अगदी नेपाळमधीलही अनेकजण गावोगावी व गल्लोगल्ली ▶ उर्वरित पान २ वर

## सहदिवसामध्ये २७५ बांगलादेशिना पोलिसांनी घेतले ताव्यात

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई गेल्या सहा दिवसांत मुंबई पोलिसांनी २७५ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले आहे. त्यामुळे जानेवारीपासून ताब्यात घेतलेल्या बेकायदेशीर बांगलादेशींची संख्या सुमारे ६५० झाली आहे. पोलिसांनी सांगितले की, बेकायदेशीर बांग्लादेशींविरोधात ३५० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. देशात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशींना ओळखून ते देशाबाहेर पाठवण्याच्या केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अलिकडच्या अधिसूचनेच्या पार्श्वभूमीवर, सुमारे २०० बांगलादेशींना हद्दपार करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या अधिसूचनेत विशेषतः बांधकाम स्थळे, वेश्याव्यवसाय ठिकाणे, घरकाम करणारे आणि खानपान सेवांमध्ये काम करणाऱ्या महिला आणि पुरुषांचा उल्लेख आहे, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. अटक केलेले बहुतेक बांगलादेशी आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत आणि ते मजूर म्हणून काम करतात, असे ते म्हणाले. बेकायदेशीरपणे सीमा ओलांडल्यानंतर ते बनावट कागदपत्रे बनवतात आणि देशात

▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार

### पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात दाद मागणा-या पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे वैतागलेले शेतकरी पवनचक्की कंपन्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूक आणि पोलिस प्रशासनाची दडपशाही या विरोधात न्याय मागण्यासाठी दि.८ गुरूवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील जनता दरबारात न्यायाच्या प्रतिक्षेत असताना जिल्ह्याच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या जिल्हाधिकारी यांनी त्यांना न्याय देण्यास असमर्थता दर्शवली व पाटोदा उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे दाद मागा मी यात काहीही हस्तक्षेप करू शकत नाही अशी हतबलता दर्शविल्याने अखेर शेतकऱ्यांनी आपली नाराजी दर्शवली व हा तर जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.



जिल्हाधिकारी बीड यांनी आठवड्यातून ३ दिवस सोमवार, मंगळवार आणि गुरुवार सकाळी ११ ते २ या वेळेत जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकल्या जातील व त्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात येईल असा बीडकरांना विश्वास दिला.याविषयी भरपूर दैनिकातुन प्रसिद्धीही झाली. त्यामुळे वारंवार तक्रारी करूनही समस्या न सुटलेल्या नागरीकांना जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून आपले गा-हाणे मांडुन ▶ उर्वरित पान २ वर



# बोधकथा- माणुसकी

एका मोठ्या शहरात, एका व्यस्त रस्त्याच्या कडेला एक भिकारी बसायचा. चेहऱ्यावर थकवा, पण डोळ्यांत एक वेगळी चमक होती. रोज येणाऱ्या जाणाऱ्यांकडे हात पसरून, काहीतरी मिळवण्याचा त्याचा प्रयत्न सुरूच असायचा.

एका दिवशी, तिथून एक अतिशय श्रीमंत, सुसंस्कृत आणि प्रभावशाली माणूस गाडीमधून जात होता. त्याचं लक्ष त्या भिकाऱ्याकडे गेलं. काहीतरी वेगळं वाटलं त्याला. गाडी थांबवून तो थेट त्या भिकाऱ्याजवळ गेला.

काय रे बाबा, तो म्हणाला, तू पाहता चांगला सशक्त आणि तंदुरुस्त दिसतोस, मग भीक कां मागतोस? भिकारी थोडा संकोचून म्हणाला, साहेब, हातात कसलीच संधी नाही. कुणी काम देत नाही. नशीब फाटलेलं आहे. जर तुम्ही मला एखादी नोकरी दिलीत, तर मी ही भीक मागणं कायमचं सोडून देईन.

त्या श्रीमंत माणसाने हसत म्हटलं, मी तुला नोकरी नाही देणार... पण त्यापेक्षाही जास्त काहीतरी देणार आहे.

भिकारी गोंधळला, डोळे विस्फारले. काय म्हणालात?

माझ्याकडे एक तांदुळाची गिरणी आहे. मी तुला गिरणीचा माल विकायला देईन. बाजारात योग्य दर मिळव. विक्रीतून होणाऱ्या नफ्याचा ९०% तुझा, फक्त १०% माझा. बघ जमतं का तुला?

भिकारी गहिवरला. त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. त्याला विश्वासच बसत नव्हता की त्याच्या नशिबात असा एखादा दिवसही लिहिलेला होता.



साहेब, तुम्ही खरंच माझ्यासाठी देवदूत आहात. तुमच्या या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही!

त्या दिवशीपासून सगळं बदललं. भिकारी कामाला लागला. सकाळपासून रात्रीपर्यंत फिरायचा. स्वस्तात चांगला तांदूळ विकायचा. लोकांना त्याच्यावर विश्वास वाटायला लागला. व्यापार वाढत गेला. काही महिन्यांत तो एक यशस्वी व्यापारी झाला.

पण एक दिवस त्याच्या मनात एक विचार आला. हे सगळं मी केलं रात्रंदिवस मेहनत घेतली तो श्रीमंत माणूस कुठे दिसतोय? केवळ संधी दिली, त्यावर एवढा वाटा का? त्याला १०% का द्यायचं?

हळूहळू त्याच्या मनात ते १०% देखील खुपायला लागले. अहंकार डोकं वर काढू लागला. आणि त्या दिवशी, ठरल्याप्रमाणे श्रीमंत माणूस नफ्याचा १०% हिस्सा घ्यायला आला. शांत चेहऱ्यानं विचारलं, कसा चाललाय व्यापार? माझा हिस्सा तयार आहे का?

तेव्हा तो माजी भिकारी चेहरा पाडून म्हणाला, साहेब, अजून हिशोब नीट झालेला नाही. काही कर्ज बाकी आहे. माझं खरंच नुकसान झालंय

श्रीमंत माणूस शांतपणे त्याच्याकडे पाहत म्हणाला, माझ्या माहितीनुसार तुला चांगलाच नफा झालाय. मी फक्त १०% मागतोय. वाटा ठरलेला आहे, आठवतंय का? भिकारी थोडा चिडून म्हणाला, साहेब, मेहनत मी केलीय, धंदा मी उभा केलाय. तुम्ही फक्त सुरुवात केलीत. आता त्या नफ्यावर तुमचा काही हक्क नाही.

त्या क्षणी, तो श्रीमंत माणूस फक्त एक स्मित करत निघून गेला.

ही गोष्ट आहे फक्त त्या श्रीमंताची आणि भिकाऱ्याची नाही ही आहे आपली आणि भगवंताची. भगवंत - आपल्याला जन्म देणारा, शरीर देणारा, वाणी, बुद्धी, जाणीव देणारा - आपल्याला जगायला संधी देतो. हे जीवन ही त्याचीच गिरणी आहे. आपण आपापल्या परीने मेहनत घेतो, प्रगती करतो.

आणि तरीही जेव्हा तो आपल्याकडे फक्त १०% वेळ, १०% श्रद्धा, १०% उत्पन्न सत्कर्मासाठी मागतो -

तेव्हा आपलं मन देखील म्हणतं, सगळं काही माझ्यामुळेच झालंय देवाचा यात काही वाटा नाही!

हेच तर आपलं अपयश आहे. म्हणून, चोवीस तासांपैकी दिवसाचे फक्त १०% भगवंताच्या स्मरणात घालवा. आपल्या कमाईतून फक्त १०% भाग सत्कर्मासाठी वापरा.

आणि कधीही विसरू नका - संधी दिल्याशिवाय प्रगती शक्यच नव्हती.

# थेंब थेंबात हास्याच्या लाटा!





आपली आनंदग्रामची लेकरं - कुठे जायचंय, कुणाकडे जायचंय, हे शब्द त्यांच्या जीवनात विरळच. सुट्ट्या आल्या की इतरांच्या घरी घराघरांत वर्दळ असते, पण आमच्याकडे शांततेत लपलेली एक वेगळीच खंत असते...

मात्र यावर्षी मात्र काहीसं वेगळं घडलं. लेकरांनी हट्ट धरला - कुठे तरी फिरायला जायचंय, थंड पाण्यात मनसोक्त डुबकी घ्यायचीय! त्या निरागस डोळ्यांतली चमक पाहून मन हललं...आणि एकच नाव मनात आलं - दर्शन शेठ कांकरिया!

दर्शन शेठ... एक उद्योजक, पण त्याहून आधी एक मनाने मोठा माणूस. कधी हॉटेल कन्हैया येथे पार्टी तर कधी चिल्या पिल्यांसाठी खाऊ व भेटवस्तू - दर्शन यांनी आनंदग्रामच्या प्रत्येक आठवणीत एक रंग भरला आहे. यंदाही त्यांची तीच माया व तेच प्रेम - सर्व लेकरांना घेऊन वृंदावन वॉटर पार्क, चाकूर येथे एक दिवशी पाण्यातला सण साजरा झाला!

पाण्याचे फवारे उडाले हास्याचे कारंजे उसळले आणि एका दिवसासाठी का होईना, आमचं प्रत्येक लेकरू फक्त लाडकं बाळ झालं. ना आजार, ना काळजी, ना एकटेपण फक्त पाणी, धमाल आणि मज्जा!

दर्शन शेठ, तुमचं मन सोन्यासारखं आहे - आणि त्या सोन्यातून आमच्या लेकरांचं बालपण उजळतंय. तुमच्यासारखे आनंदयात्री भेटणं हीच आनंदग्राम ची खरी श्रीमंती आहे.

**- संस्थापक अध्यक्ष**
**दत्ता बारगजे**

पान १ वरून पुढे...

## तर तात्काळ...

'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.

पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.

सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा. सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या. नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.

शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या

सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

## वारकरी संप्रदाय...

नारायणबाबांच्या वास्तव्याने हा गड पावन झाला आहे त्याची अनुभूती आपण सारे घेत आहोत अशा भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केल्या. याबरोबरच सध्या आपला देश युद्धजन्य परिस्थितीत असून अत्यंत खंबीरपणे उभा असून पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या नेतृत्वात 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानला घरात घुसून उत्तर देतोय असे त्यांनी नमूद केले. यावेळी तारकेश्वर गडाचे महंत शांतीब्रह्म आदिनाथ शास्त्री महाराज, धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले उपस्थित होते तर जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, सचिन मूळूक, स्वप्नील गलधर, युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण तसेच शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि वारकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाकिस्तानच्या गोळीबारात...

दिलेल्या प्रत्युत्तरात पाकिस्तानी सैन्याचेही मोठे नुकसान झाले आहे. तसेच या कारवाईत भारतीय लष्कराचे काही जवान शहीद झाले आहेत. तर, काही जवान जखमी झाले आहेत.

या पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले, पाकिस्तानने आपले कृत्य मान्य करण्याऐवजी, भारतीय सशस्त्र दल अमृतसरसारख्या त्यांच्याच शहरांना लक्ष्य करत आहेत आणि पाकिस्तानवर दोषारोप ढकलण्याचा प्रयत्न करत आहे असे हास्यास्पद आणि अपमानजनक दावे केले आहेत. भारताने नानकाना साहिब गुरुद्वारावर ड्रोन हल्ला केला अशी चुकीची माहिती पाकिस्तानने पसरवली आहे, जी खोटी आहे. जातीय वाद निर्माण करण्याच्या उद्देशाने पाकिस्तान परिस्थितीला सांप्रदायिक रंग देण्याचा प्रयत्न करत आहे.

ते पुढे म्हणाले की, काल रात्री पाकिस्तानने केलेल्या या चिथावणीखोर आणि आक्रमक- कृतींमध्ये भारतीय शहरे आणि नागरी पायाभूत सुविधा तसेच लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य करण्यात आले. याला भारतीय सशस्त्र दलांनी अतिशय संतुलित प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानने या हल्ल्यांची जबाबदारी नाकारणे हे त्यांच्या ढोंगीपणाचे उदाहरण आहे.

याच पत्रकार परिषदेत बोलताना, कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या, ८-९ मे च्या मध्यंतरी रात्री, पाकिस्तानी सैन्याने लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याच्या उद्देशाने संपूर्ण पश्चिम सीमेवर अनेक वेळा भारतीय हवाई हद्दीचे उल्लंघन केले. पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवरही मोठ्या कॅलिबर शस्त्रांचा गोळीबार केला. आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवरील ३६ ठिकाणी घुसखोरीसाठी ३००-४०० ड्रोनचा वापर करण्यात आला. भारताने यापैकी अनेक ड्रोन पाडले. दुसरीकडे, पाकिस्तानने नागरी विमानांचा वापर ढाल म्हणून केला.

## भिऊ नकोस...

असलेल्या कथेचे श्रवण केले. यावेळी महोत्सव समितीच्या वतीने माजी मंत्री क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी ह.भ.प. भालचंद्र देव, विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, नानासाहेब काकडे, हर्षद क्षीरसागर आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, केज शहरात स्वामी समर्थ यांच्या स्वतःहून दिलेल्या पादुका आणि त्यांचे वापरातील वस्तू दीडशे वर्षांपासून पूजल्या जात आहेत. या मठाच्या स्थापनेला दीडशे वर्ष झाले असले तरी याद्वारे दरवर्षी पाडव्याला मोठा उत्सव साजरा केला जातो आणि स्वामींचे स्मरण भक्ती भावाने केले जाते. अक्कलकोट येथे केजकर स्वामींची समाधी आहे. निरंतर देशपांडे यांची ही परंपरा अखंडित सुरू आहे. इथे प्रत्येकजण जोडला जातो परस्पर भावना जोडून ठेवणारा हा मठ असून बीड जिल्ह्याचा हा ठेवा आहे. अनेक संप्रदाय आहेत त्यात श्रीदत्त संप्रदाय हा पण एक सरळ जीवन जगण्याचा मार्ग दाखवणारा आहे. स्वामी समर्थ हे कुठल्याही अंधश्रद्धा न बाळगता वास्तवात जीवन कसे जगावे, संस्कारित आयुष्य कसे जगावे हेच सांगतात, भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा मूलमंत्र देऊन त्यांनी रंजल्या गांजल्या लोकांना ऊर्जा दिली. भक्ती भावाने समर्पण करत जो भक्त स्वामींकडे येतो त्याच्या आयुष्याचे कल्याण होते असे अनेकांचे अनुभव आहेत म्हणूनच भक्त स्वामींच्या कृपाशीर्वादाने सुखी जीवन जगत आहेत. बीड जिल्हा हा अध्यात्मिक श्रीमंती लाभलेला जिल्हा आहे त्यामुळेच अनेक गावे समृद्ध झाली आहेत असे सांगून त्यांनी सुरू असलेल्या ह.भ.प. भालचंद्र देव यांच्या कथेचे श्रवण केले यावेळी प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, समर्थ भक्त सर्व देशपांडे परिवार यांच्यासह भाविक भक्तांची उपस्थिती होती.

## पुरंदरला परप्रांतीय...

दिसत आहेत. यातील काही कामगार इमाने-इतबारे चांगले कामही करत आहेत. परंतु, काहीजण गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत. दिवसभर काम केल्यानंतर सायंकाळी दारू पिऊन आपापसांत भांडणे करून गावातील वातावरण दूषित करत आहेत. यातील अनेक त्यांच्या राज्यात गुन्हेगारी करून इकडे पळून आल्याचेही समजते.

मात्र, भविष्यात या लोकांमुळे पुरंदर तालुक्यातही एखादा अनुचित प्रकार घडण्याची दाट शक्यता आहे. सासवडमध्ये सोमवारच्या बाजाराममध्ये अनेकदा गर्दीचा फायदा घेत मोबाईल, महिलांचे दागिने, पुरुषांचे पाकीट चोरी जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. पोलिसांत तक्रार करूनही आपली वस्तू आपल्याला मिळेलच याची खात्री नसल्यामुळे नागरिक तक्रार करत नाहीत. मध्यंतरी पुरंदर तालुक्यातील मोठी बाजारपेठ असणारे निरा या ठिकाणी एकाच वेळेस पाच दुचाकी बाजारातून चोरीला गेल्या आहेत. तसेच, जेजुरीतूनही छोट्या-मोठ्या चोरीच्या घटना वेळोवेळी घडताना दिसत आहेत. गावखेड्यातील विहिरींवरील वीजपंप, गायी, म्हशी, बैल चोरीला जाण्याच्या घटना घडत आहेत. तसेच, काही ठिकाणी अनेक परप्रांतीय मजुरांनी आपल्या राहत्या घराच्या शेजारील अल्पवयीन मुलींनाही फूस लावून पळवून नेल्याच्या घटना घडत आहेत.

त्यामुळे वेळीच पोलिस प्रशासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. तसेच, प्रत्येक गावातील पोलिस पाटील व सरपंच यांनीही आपल्या गावात असलेल्या परप्रांतीयांची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात करून त्यांची माहिती पोलिसांना देणे गरजेचे आहे; अन्यथा चुकीच्या घटना घडल्यास त्याला सरपंच व पोलिस पाटील यांना जबाबदार धरले पाहिजे, असेही नागरिक बोलत आहेत.

## सहदिवसामध्ये...

राहून भारतीय नागरिक असल्याचे भासवतात.२०२४ मध्ये भारताच्या परदेशी प्रादेशिक नोंदणी अधिकाऱ्यांनी (ऋञठज) २,३३१ परदेशी लोकांना हद्दपार केले होते. त्यापैकी ४११ बांगलादेशी नागरिक होते. नायजेरियन निर्वासितांची संख्या १,४७० इतकी होती.जानेवारीमध्ये अभिनेता सैफ अली खानच्या घरात घुसून त्याच्यावर हल्ला केल्याबद्दल मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजादला अटक करण्यात आल्यानंतर मुंबईत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशींचा मुद्दा ऐरणीवर आला होता.त्यानंतर मुंबईव पोलिसांनी (ीीलरळ ेंश्रिळलश) केलेल्या अनेक कारवायांमध्ये बांग्लादेशी नागरिकांना अटक करण्यात आली. तसेच काहींना त्यांच्या मायदेशी परत पाठवण्यात आले. हेही वाचामेट्रो लाईन ३ १० मे पासून प्रवाशांसाठी खुली होणारबेस्ट बसच्या तिकीटदरात वाढ

## जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा..

आपले प्रश्न सुटणार अशा आशा पल्लवित झाल्या होत्या मात्र त्या फोल ठरल्याची प्रतिक्रिया पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी दिली आहे. जनता दरबारात नागरीकांच्या तक्रारी अनुषंगाने संबंधित विषयांच्या अधिकाऱ्यांना (फोनवर )बोलुन विषय मार्गी लावण्याचे आदेश दिले जातील आणि जिल्हाधिकारी यांनी आदेश दिल्याने आपल्या समस्या मार्गी लागतील अशी भावना असते.त्यामुळे तक्रारदार नागरीकांचे निदान समाधान तरी होते. दि.०७ मे बुधवार रोजी सकाळी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांना मावेजा न देताच शेतातुन विद्युत तारा ओढण्याचे काम पोलिस बंदोबस्तात जबरदस्तीने होत होते.याला शेतकऱ्यांनी विरोध केला त्यामुळे त्याठिकाणी काही काळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे हे सुद्धा शेतकऱ्यांच्या विनंती वरून घटनास्थळी पोहोचले. त्यांना शेतकऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांनी आर्थिक फसवणूक केली असुन मावेजा न देणे,कमी जास्त मावेजा देणे, न वटणारे धनादेश देणे व मावेजा मागितल्यावर पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही असे प्रकार सुरू असल्याचे सांगितले.याविषयी उपस्थित पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके पाटोदा पोलिस स्टेशन यांच्याशी डॉ.गणेश ढवळे यांनी व शेतकऱ्यांनी संवाद साधला असता. सशुल्क पोलिस संरक्षण मागितल्याने आमची कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये हि आमची जबाबदारी असुन मावेजा मिळणे,काम थांबविणे आमच्या हातात नसुन तुम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडून काम थांबविण्याचे आदेश आणा असे सांगितले. त्यानंतर पाचेगाव येथील १० शेतकरी यांनी दुपारी भाड्याने गाडी करून पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार दिली.त्यांना दुसऱ्या दिवशी जनता दरबारात बोलावले.काल दि.०८ गुरुवार रोजी आठवडी बाजार असतानाही शेतकरी पुन्हा भाड्याने गाडी करून जिल्हाधिकारी यांना भेटून मावेजा न देताच तारा ओढत असुन ते काम मावेजा मिळेपर्यंत थांबवावे अशी विनंती केली.जिल्हाधिकारी यांनी पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क संरक्षण मागितले असल्याने मला काम थांबवता येत नाही असे म्हणत तुम्ही पाटोदा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना भेटून ते ठरवतील तो मावेजा घ्या.मला यात काहीही करता येत नाही असे सांगितले आणि पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी अथवा तहसीलदार यांच्याशी फोनवरून सुचना न देताच आल्या पावली घरी पाठवले. त्यामुळे आता पिडीत शेतकऱ्यांना असा प्रश्न पडला की जिल्हाधिकारी यांच्या हातात काही नाही तर मग आम्हाला गाडी भाडे करून दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात का बोलावले?????त्यामुळे पाचेगाव शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या जनता दरबाराला बिनकामाचा दरबार भरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली.

पान ४ वरून पुढे...

## योगेश्वरी देवी...

आणि पुढे २००६ मध्ये दोन स्वतंत्र घटना अर्ज दाखल झाले. या अर्जांवर सुनावणी सुरु असताना संबंधित पक्षकारांनी परस्पर सामंजस्य करून एकत्रित घटना मंजूर केली. १९ नोव्हेंबर २०१६ रोजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बीड यांनी ती घटना मंजूर केली. या घटनेला गिरीश, कृष्णा, पृथ्वीराज, योगीराज, धर्मराज आणि राजन पुजारी यांनी विरोध करत न्यायालयात धाव घेतली. त्यांचा दावा होता की, ते मूळ अनुदानधारक नरसुबाई यांचे वंशज असून, त्यांना या मंदिरात पूजारी तसेच विश्वस्त म्हणून वंशपरंपरागत अधिकार आहेत. त्यांच्या मते, २०१५ मध्ये त्यांची नावे ट्रस्टच्या यादीत विश्वस्त म्हणून अधिकृतपणे नोंदवली गेली होती. मात्र, २०१६ मध्ये मंजूर झालेल्या घटनेत त्यांना सुनावणी न देता निर्णय घेण्यात आला, जो कायद्याच्या विरुद्ध आहे, असे त्यांनी नमूद केले. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून, स्पष्ट केले की पुजारी यांची बाजू ऐकून न घेता घटना मंजूर केली गेली, हे न्यायनिष्ठतेच्या तत्वांना विरोधात आहे. उच्च न्यायालयाने १९ नोव्हेंबर २०१६ चा सहाय्यक धर्मादाय आयुक्तांचा आदेश व त्यावर आधारित २८ फेब्रुवारी २०२३ चा जिल्हा न्यायालयाचा निर्णय रद्द करण्यात आला. हे प्रकरण नवीन सुनावणीसाठी पुन्हा बीडच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे पाठवण्यात आले असून, सर्व पक्षकारांनी १६ जून २०२५ रोजी हजर राहावे, असे आदेश दिले आहेत. नवीन निर्णय ९ महिन्यांच्या आत म्हणजे १६ मार्च २०२६ पर्यंत द्यावा लागेल. तोपर्यंत मंदिर ट्रस्टचे प्रशासन २०१६ च्या घटनेनुसारच चालवले जाईल असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## स्व बाळासाहेब ...

बीड विभागातील नेकनूर स्थानकाची पाहणी करण्यासाठी जालना विभागाचे विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी श्री श्याम गायकवाड व विभागीय वाहतूक अधीक्षक जालना विभाग योगेश गीते यांनी बस स्थानकाची पाहणी केली व उपलब्ध सोयी सुविधांचा आढावा घेतला दै.पूढारीचे , लोकप्रश्न चे पत्रकार मनोज गव्हाणे यांची उपस्थिती होती यावेळी बीड आगाराचे वाहतूक अधीक्षक भीमकिरण बनसोडे यांनी सोयी सुविधांची माहिती दिली पिण्याच्या पाण्याची सोय हिरकणी कक्ष प्रसादन कक्ष व सोयी सुविधांची माहिती दिली आदिंची माहिती दिली केलेल्या कार्याचा पूस्तकरुपी अहवाल सादर केला

## भारतीय सैनिकांच्या...

बस्थानकमागे असणारे शिवसेनेचे जिल्हा संपर्क कार्यालय या ठिकाणी हे शिबीर आयोजित केले आहे. बीड शहरातील सुजान नागरिकांनी, तरुण युवक - युवतीनी, देशाभिमान असणाऱ्यांनी, शिवसैनिकांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करून भारतीय लष्करी सैनिकांना प्रोत्साहन द्यावायचे आहे.

## सप्ताहात बंकटस्वामी...

भाची हिचा विवाह अजय घोडके बोरखेड यांच्याशी लावून संस्थाने कन्यादान करत संसार उपयोगी साहित्य देत स्तुत्य उपक्रम राबवला आहे आणखीनही १३ मे पर्यंत संस्थान गरजू मुलींचे कन्यादान करणार असल्याने परिसरातील इच्छुक वर वधू पित्यांनी लाभ घेण्याचे आवाहन संस्थांचे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे व विश्वस्त , अन्नदान समिती , व नेकनूरकरांच्यावतीने करण्यात आले आहे

## जिल्हा क्रीडा...

परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यामाने जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र याद्वारे सॉफ्टबॉल, बेसबॉल, मैदानी, या खेळांचे जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र अंतर्गत दि १५ में से २४ में २०२५ या कालावधीत शिबीराचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सकाळी ०७ ते १० वा. व सायंकाळी ०४:३० ते ०६:३० पर्यंत करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रवर नियमीत प्रशिक्षण घेणारया खेळाडूंना सदर शिबीराचा लाभ घ्यावा. या शिबिरात सॉफ्टबॉल खेळासाठी श्री. सतिश राठोड, क्रीडा मार्गदर्शक बेसबॉल खेळासाठी श्री. रेवननाथ शेलार, क्रीडा मार्गदर्शक आणि मैदानी खेळासाठी श्री. अविनाश पाटील, क्रीडा मार्गदर्शक करणार आहेत. अधिक माहितीसाठी श्री. सतिश राठोड (सॉफ्टबॉल क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९९२५०१९३५३), श्री. रेवननाथ शेलार (बेसबॉल क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९०७५४७६७५१), श्री. अविनाश पाटील (मैदानी क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९६२३७८११२१) यांच्याशी संपर्क साधावा असे अवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 'भाऊ' ही सज्ञा सद्गुरु बंकटस्वामी महाराजांनी वामनभाऊंना दिली: महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहीनाथगडकर

### ▸संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सव

**नेकनूर । प्रतिनिधी**

भाऊ ही सज्ञा सद्गुरू बंकटस्वामी महाराजांनी वामनभाऊंना दिली.आमचे कुळ आणि मूळ बंकटस्वामी आहे. असे प्रतिपादन महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहीनाथ गडकर यांनी केले संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, मुकुंदराज संस्थांचे मठाधिपती किसन महाराज पवार, गाथा कंठस्थ मारुती महाराज चोरमले , अर्जुन महाराज शिंदे,जनार्धन महाराज बांगर,श्री ह भ प नाना महाराज



कदम. सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती. बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहिनीनाथगडकर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या

आजी संसार सुफळ जाला गे माये ।
देखियले पाय विठोबाचे ।।
तो मज व्हावा तो मज व्हावा ।
वेळों वेळां व्हावा पांडुरंग ।।
बापरखुमादेविवरू न विसंबे सर्वथा ।
निवृत्तीने तत्त्वतां सांगितले ।।

या अभंगावर चिंतन मांडले यावेळी बोलताना विठ्ठल महाराज म्हणाले की. संत बंकटस्वामी महाराज आणि संत वामनभाऊ महाराज यांचे गुरूशिष्य अतूट नाते होते. एका अधिकमासात कीर्तन महिनाभर झालेला विषय परत आला नाही पाहिजे. अस बंकटस्वामी महाराज यांनी सांगितले. त्यावेळी संत वामनभाऊ यांनी किर्तन केले त्यावेळी स्वामी खुश झाले आणि त्यानंतर भाऊ ही सज्ञा स्वामी महाराजांनी दिली. असा इतिहास विठ्ठल महाराज यांनी सांगितला. पुढे बोलताना स्वामीच्या काकडा भजनाला १० हजार भाविक भक्त पहाटे उपस्थित राहत.रामकृष्ण हरी सप्ताह स्वामी महाराजांनी सुरुवात केली. बंकटस्वामी हे कामधेनू आहेत त्या काम धेनुचे दूध आम्हाला प्यायला मिळाले असेही महाराज म्हणाले.

आचार,विचार आणि संस्कार.. या गोष्टी आध्यात्मिक साधकांनी पाळल्या पाहिजेत. स्वामी महाराज हे वारकरी पंथाचे मालक होते. प्रत्येकाने आपले मूळ आणि कुळ शोधले पाहिजे.संत वामनभाऊ महाराज यांचे कुळ आणि मूळ स्वामीची गादी आहे त्यामुळेच तर वामन भाऊंच्या आरतीत कृपा अखंड बंकटस्वामीची असा उल्लेख आढळतो. आम्ही स्वाभिमाने सांगतो आम्ही स्वामीचे आहोत काहीना नाव घ्यायला संकोच होतो असे विठ्ठल महाराज म्हणाले. यावेळी साथ संगत श्री ह भ प सर्वश्री रोहिदास महाराज शिंदे,वारकरी भजन स्वरवैभव अशोक शास्त्री महाराज, वसंत महाराज शिंदे, सतीश महाराज जाधव, मृदंग साथ राम महाराज, अभय महाराज कोकाट यांच्यासह बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी मंडळी गुरुजन मंडळी व विद्यार्थी मंडळी उपस्थित होते..

## विभागातील आठही जिल्हयांमध्ये सस्ती अदालत उपक्रम नियमितपणे राबवा: विभागीय आयुक्त दिलीप गावडे

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील नागरिक, शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्याकामी गतीने न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्येक माहिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी शक्यतो तहसिल कार्यालयात किंवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी 'सस्ती' अदालत उपक्रम विभागातील आठही जिल्हयांमध्ये राबवा, असे निर्देश विभागीय



आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिले. छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्हयातील तहसिल कार्यालयात आज सस्ती अदालतीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधला. आज शेतरस्ते शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांच्या समक्ष सहमतीने काही प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

यावेळी अपर आयुक्त विजय देशमुख, सहआयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, यांच्यासह संबंधित जिल्ह्यांचे निवासी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, तालुका उप अधिक्षक, भूमी अभिलेख, पोलीस विभागातील अधिकारी संबंधित तहसिल कार्यालयात उपस्थित होते. विभागातील जे शेतरस्ते, पाणंद रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेत जमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारीही होतात. राज्यातील सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जे दार करावी, शेतरस्ते बंद करणा-यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते.



*वीरशिरोमनी महाराणा प्रताप⁎ यांच्या जयंती निमित्त राजपुत समाज बांधवांच्या वतीने अभिवादन कार्यक्रमास सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे व शिवसेना जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांनी उपस्थित राहून अभिवादन केले यावेळी झुंजार धांडे,डॉ.राजीव काळे,सुरेश तात्या शेटे,मुकूंद भालेकर,किशोर राऊत,मधुकर धांडे, संध्याताई राजपूत,मीराताई गांधले,आयोजक जयसिंग चुगडे, विक्रांत हजारे,राणा चव्हाण,प्रकाशसिंग ठाकूर,रतन गुजर,विक्रमसिंग कपूर यांच्या सह रजपूत समाज बांधव व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*



*क्षत्रिय राजपूत महाराणा प्रताप यांची आज जयंती. बीड शहरातील यशवंत उद्यानात असणाऱ्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास आज अभिवादन करताना शिवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, जयसिंग मामा चुंगडे, सुरेश तात्या शेटे, सुशील पिंगळे, संजय महाद्वार, रतन तात्या गुजर, राणा चव्हाण, विक्रांतसिह हजारें,सतीशसिंह परदेशीं, सुरज चुंगडे, पंकज बाहेगाव्हाणकर सह आदी..*

## 'विद्रोही आंबेडकरी जलसा' कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे : प्रशांत ससाणे

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुध्द जयंती निमित्त सम्यक प्रतिष्ठाण बीड आयोजित विद्रोही आंबेडकरी जलसा हा भिमगीत प्रबोधनाचा कार्यक्रम रविवार, ११ मे २०२५ रोजी सायं. ६.३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. हा 'विद्रोही आंबेडकरी जलसा'चे उद्घाटक बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे हे असणार आहेत. तर जलसा कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून आर.एस.गायकवाड, महेंद्र शिंदे, विजय आगलावे, संदीप जोगदंड यांची उपस्थिती असणार आहे. या जलसा कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सम्यक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष तथा बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाणे यांनी केले आहे.

प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून देशातील जात वर्ग-स्त्री दास्य (गुलामगिरी) अंताची विद्रोही गाणी, फुले-शाहू-आंबेडकरांचे विचार घरा-घरात पोहचविण्यासाठी डफावर थाप आणि विद्रोही सुर घेऊन विद्रोही आंबेडकर जलसा हा भिमगीत व प्रबोधनांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे जेणे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य समाजातील तळागळातील प्रत्येक वंचित घटकापर्यंत पोहोचतील यासाठी सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन सम्यक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रशांत ससाणे यांच्यासह शांतीदूत घोडके, वैभव वाघमारे, सचिन ससाणे, रोहन साळवे, सिध्दार्थ जोगदंड, अशोक हुंबरे, किरण ससाणे, प्रफुल गायकवाड यांनी केले आहे.

## सुभाष बेदमुथा यांचे संथारा व्रतात निधन

**बीड । प्रतिनिधी**



येथील प्रसिद्ध किराणा व्यापारी सुभाषचंद चंदूलालजी बेदमुथा यांचे आज (दि.९) रोजी पहाटे २.३० च्या सुमारास अल्पशा आजाराने संथारा व्रतात निधन झाले. मागिल काही महिन्यांपासून ते फुफसाच्या आजाराने त्रस्त होते. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन मुले, दोन मुली, जावई, नातु असा मोठा परिवार आहे.

## संत गजानन महाराज मंदीरात मुर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम उत्साहात

### धर्म,शास्त्र,ग्रंथाचा अभ्यास करून मुर्तीची निर्मिती, भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा: मंदीर समितीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सहयोगनगर भागात असलेल्या ब्रह्माण्डनायक संत गजानन महाराज मंदीरात गणनायक श्री गणेशाची व गुरूनायक श्री दत्त गुरूच्या मुर्तीची उत्साहात प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली. यानिमित्त मंदीरात तीन दिवस धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील संत गजानन महाराज मंदीराला २५ वर्षे पुर्ण झाले असून या रौप्य महोत्सव वर्षानिमित्त भाविकांच्या मदतीने नुतनीकरण करण्यात आले असून भव्य अशा मंदीरात आता श्री गणेशाच्या मुर्तीबरोबरच दत्त गुरूची मुर्ती





बसविण्यात आली असून पुढील टप्प्यात प्रभु श्रीराम, लक्ष्मण,सीता आणि हनुमंताच्या मुर्तीबरोबरच समर्थ रामदास स्वामी, आणि महादेव मुर्तीची प्राणप्रतिष्ठापणा करण्यात येणार आहे. दि. ७ ते ९ मे या कालावधीत झालेल्या मुर्ती प्रतिष्ठाणा सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्र म आयोजित करण्यात आले होते.मंदीरात बसविण्यात आलेली गणेशाची आणि दत्त गुरूंची मुर्ती अप्रतिम असून विविध कथा आणि पुराणाचा अभ्यास करून ही मुर्ती बनविण्यात आल्याने देशातील एकमेव मुर्ती ठरणार असल्याचे यावेळी मंदीर समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे. भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्टार्टअप ही लोकचळवळ झाली पाहिज़े - मंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई । प्रतिनिधी**

एकेकाळी भारताचा जगभरात व्यापार होता. घराघरात लघु आणि कुटीर उद्योगही सुरु असायचे, त्यामुळेच भारताला 'सोने की चिडिया' म्हटले जात होते. देशाला पुन्हा ते वैभव मिळवून देण्यासाठी स्टार्टअप ही लोकचळवळ व्हायला हवी, असे प्रतिपादन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले. आज सहभागी झालेल्या कार्यक्रमात शासनाच्या सहा विभागांनी स्टार्टअप्स सोबत काम करण्यास अनुमती दर्शवली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सामान्य प्रशासन विभागामार्फत टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक हा ५ ते ९ मे दरम्यान कार्यक्रम आयोजित केला आहे.

# खरीप हंगामाचे नियोजन करताना शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवावे

**माजलगाव । प्रतिनिधी**

पंचायत समिती कार्यालयात माजलगाव,वडवणी व धारूर तालुक्यातील खरीप पूर्व हंगाम आढावा बैठक घेण्यात आली. खरीप हंगामाचे नियोजन करताना शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवावे ही महत्वपूर्ण सूचना करण्यात आली.

खरीप हंगाम २०२५ च्या अनुषंगाने प्रशासनाकडून तीस कलमी कार्यक्रम राबवण्यात येणार असून यामध्ये खरीप हंगाम सभेचे नियोजन,माती परीक्षण मोहीम व जमीन आरोग्य पत्रिका वाटप, बीज प्रक्रिया मोहीम,घरगुती चाचणी पद्धतीने बियाणे उगवण क्षमता तपासणी प्रात्यक्षिक मोहीम, क्रॉपसॅप व हॉर्टसॅपसाठी शेतकरी निवड व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण,शेतीशाळा नियोजन,प्रमुख खरीप पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गांवनिहाय प्रशिक्षण मोहीम,जमीन सुपीकता निर्देशकांच्या आधारे खतांचा वापर,आपत्कालीन पिक नियोजन,महाडीबीटी प्रणालीवर अर्ज वाढविणे कृषि निविष्ठाच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम,पुरस्कारासाठी शेतकरी निवड,बीबीएफ / मुलस्थानी जलसंधारण/पट्टापेर पद्धत,हिरवळींच्या खतांचा निर्मिती व वापर,बायोचार निर्मिती बाबत शेतकऱ्याना अवगत करणे,फळबाग लागवडीसाठी सीआरए तंत्राचा वापर,यशोगाथा संकलन मोहीम,कृषी विषयक माहिती व तंत्रज्ञानांची साधने याबाबत माहिती देणे अशी विविध तीस कलमांचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन खरीप हंगामाचे नियोजन करण्यात येणार आहे.

खत आणि बियाणे पुरवठा संबंधी योग्य नियोजन करावे.याबाबतीत शेतकऱ्यांची हेळसांड होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना प्रशासनास दिल्या.

कर्जवाटपा बाबत उद्दिष्ट पूर्ण करत असताना, जुन्या शेतकऱ्यांसह नवीन शेतकऱ्यांना विचारत घेऊन पीक कर्ज देण्याबाबत आराखडा तयार करून नवीन शेतकऱ्यांना पीक कर्जाचा लाभ देण्यासाठी बँकांनी प्रयत्न करावेत. पिक कर्ज वाटपाबाबत स्वतंत्र आढावा बैठक घेण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचना यावेळी दिल्या.



CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

शनिवार, दि.१० मे २०२५ पान ४



संत बंकटस्वामी महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाच्या सांगता प्रसंगी उपस्थित राहावे यासाठी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण देताना गुरुवर्य महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, किसान महाराज पवार.

# आज हातात हंडा आहे, उद्या दांडा असेल!

# संतप्त आंदोलकांचा नगर पालिकेला खणखणीत इशारा

## बीड नगर परिषदेने शहरातील नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये: शेख निजाम





## पाणीपुरवठा सुरळीत करा, विशेष स्वच्छता मोहीम राबवा शहरातील सर्व पथदिवे सुरू करा : भागवत तावरे

## आजपासून सुरळीत पाणीपुरवठा होणार : मुख्याधिकारी नीता अंधारे

**बीड । प्रतिनिधी**

मागील सहा महिन्यापासून बीड शहरांमध्ये नगरपरिषदेच्या नाकर्तेपणामुळे व नियोजन शून्यते मुळे झालेल्या अभूतपूर्व पाणी पुरवठाच्या संदर्भात बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला होता त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम व लोकपत्रकार भागवत तावरे,युवा नेते बळी गवते यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपरिषद प्रशासना विरोधात भव्य हंडा मोर्चाचे आयोजन दिनांक ९ मे २०२५ रोजी करण्यात आले होते सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील सर्वपक्षीय नेते नगरसेवक शेख अमर,मुन्नाभाई इनामदार , सय्यद इलियास, कय्युम इनामदार, आयुब पठाण, सय्यद फहीम,सय्यद आझम ,शेख हमीद,शहबाज कादरी, सत्तार इनामदार,शेख कदीर,शेख जाकीर, सादिक पठाण,शेख पाशा, जयंत वाघ,यांच्या सहित हजारो सुजाण नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती सदरील मोर्चा च्या निमित्ताने उपस्थित असलेल्या भारतीय जनता पार्टीचे मा.जिल्हा परिषद अध्यक्ष मीरा ताई गादले, शहराध्यक्ष अशोकजी लोढा ,भारतीय जनता पार्टीच्या अँड संध्याताई राजपूत, नगरसेवक सय्यद इलियास, मुन्ना इनामदार ,रुपाली देशपांडे , पठाण रेहानाताई ,प्रीतताई कुकडेजा, सोनलताई पाटील, आदी आदींनी पाणीपुरवठा स्वच्छता व नगर परिषदेच्या गैरव्यवहार बाबत संबोधित केले यावेळी बोलताना लोकपत्रकार भागवत तावरे यांनी बीड नगर परिषदेमध्ये एकूणच चाललेला निरंकुश गैरव्यवहार व त्यामुळे होणारी बीड शहरातील नागरिकांची हेळसांड या प्रश्नावर आपले सविस्तर मत मांडले व सदरील मोर्चाचे आयोजक शेख निजाम यांनी आपल्या संबोधनांमध्ये बीड नगर परिषदेने आपले कर्तव्य समजून बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यावा ज्यात प्रामुख्याने विस्कळीत असलेला पाणीपुरवठा सुरळीत करून किमान आठ दिवसाला शहराला पाणीपुरवठा करण्यात यावा येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी बीड शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून युद्ध पातळीवर नालेसफाई व कचऱ्याची विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यात यावे व बीड शहरातील बंद अवस्थेत असणाऱ्या सर्व पथदिवे चालू करण्यात यावे अशा मागण्या वेळ मुख्याधिकारी नीता अंधारे यांना निवेदनात दिलेल्या मागण्या पालकमंत्री मा.अजित दादा पवार यांच्या सूचनेनुसार मान्य केल्या व तात्काळ आज पासून सुरळीतपणे पाणीपुरवठा व स्वच्छता व ईतर सर्व कामे पूर्ण करून करू अशी ग्वाही शिष्टमंडळास दिली

यावेळी भव्य हंडा मोर्चात मोठ्या संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते व यामध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती.

## योगेश्वरी देवी मंदिर ट्रस्टची २०१६ ची घटना रद्द

### उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय ; प्रकरण नव्याने सुनावणीसाठी पाठवले

**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई : अंबाजोगाई येथील ऐतिहासिक आणि श्रद्धास्थान असलेल्या श्री योगेश्वरी देवी मंदिर ट्रस्ट संदर्भातील २०१६ ची बहुचर्चित घटना उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रद्दबातल ठरवली असून, हे प्रकरण पुन्हा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे



पाठवले आहे. हा महत्वाचा निर्णय न्यायमूर्ती रोहित डब्ल्यू. जोशी यांच्या खंडपीठाने तो दिला. योगेश्वरी देवी मंदिर ट्रस्टची स्थापना १९६५ मध्ये चझढ अधिनियमाअंतर्गत झाली. सुरुवातीला १९७३ मध्ये ट्रस्टची घटना ठरवली गेली होती. परंतु त्या घटनेवर हरकती घेतल्याने ती रद्द झाली ▶▶ उर्वरित पान २ वर

## स्व बाळासाहेब ठाकरे स्वच्छ - सुंदर बसस्थानक अभियान अंतर्गत नेकनूर बसस्थानक परिसराची अधिकाऱ्यांनी केली पाहणी

**नेकनूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या तिने राज्यभरात सुरू असलेल्या हिंदुह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बस स्थानक अभियानांतर्गत शुक्रवारी नेकनुर येथील बस स्थानकास वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांनी भेट दिली या पथकाने संपूर्ण बस स्थानकाची पाहणी केली. याबाबतची



अधिकची माहिती अशी की संपूर्ण राज्यभरात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यभरात हिंदुह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बस स्थानक ही संकल्पना राबवली जात आहे या अंतर्गत राज्यातील बस स्थानकात बस स्थानकांची स्वच्छता ,सजावट, रंगरंगोटी प्रवाशांच्या सुविधासाठी उपलब्ध असणाऱ्या सोयी या परिपूर्ण असाव्यात हे अपेक्षित आहे या अंतर्गत ▶▶ उर्वरित पान २ वर

## मराठवाडा अर्बन को. ऑप. सो. बीड यांना कर्जापोटी दिलेला धनादेश न वटल्याने कर्जदारास बारा महिने कैद व दंडाची शिक्षा

**बीड । प्रतिनिधी**



बीड येथील जयनाथ एकनाथ धांडे यांनी मराठवाडा अर्बन को. ऑप. क्रे. सोसा. लि. बीड यांचेकडून कर्ज घेतले होते व सदर कर्जाचे हप्त्या पोटी जयनाथ एकनाथ धांडे यांनी वरील संस्थेस धनादेश दिला होता, परंतू खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने सदर धनादेश न वटता परत आला त्यामुळे वरील संस्थेने आरोपी जयनाथ एकनाथ धांडे याचे विरुध्द कलम १३८ एन. आय. अॅक्ट प्रमाणे प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणात मराठवाडा अर्बन को. ऑप. क्र. सोसा. लि. बीड च्या वतीने प्राधिकृत अधिकारी जालिंदर उत्तम गवळी तसेच मुख्य ।कार्यकारी अधिकारी शिवाजी भगवानराव देसाई यांनी दिलेली साक्ष व दाखल केलेली कागदपत्रे यांचा विचार करुन, मा. ५ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बीड यांनी कर्जदार / आरोपी जयनाथ एकनाथ धांडे, रा. गणेश नगर, बीड यास १२ महिने कैदेची शिक्षा व नुकसान भरपाई पोटी रु. २,१०,२५०/- फिर्यादी संस्थेस देण्याचा आदेश केलेला आहे. दंडाची रक्कम ३० दिवसांत न भरल्यास अतिरीक्त ६ महिने कैदेची शिक्षा देण्या बाबत आदेश केलेला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी बँके तर्फे अॅड. रविंद्र एस. वाघमारे यांनी काम पाहिले, त्यांना संस्थेचे विधी सल्लागार डी. एम. डबड़े यांनी मार्गदर्शन केले. मा. न्यायालयाचे वरील निकालामुळे संस्थेचे थकीत कर्जदार यांचेत खळबळ माजली आहे.

## विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची २१ मे रोजी बैठक

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची २१ मे रोजी दुपारी ०२.०० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली असून विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर तथा अध्यक्ष, विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार असल्याचे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य सचिव तथा उपायुक्त (महसूल) यांनी कळविले आहे. विलंब, गैरव्यवहार, अकार्यक्षमता व इतर कारणाने होणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत जनतेच्या तक्रारी तसेच गाऱ्हाणी समितीकडून ऐकून घेण्यात येत असून लेखी स्वरूपातील तक्रारी स्विकारण्यात येतात. विशिष्ट अभिकथनाबाबत स्वतंत्र्यपणे स्थानिक चौकशी करण्याच्या दृष्टीने तजवीज करण्यात आली आहे. भ्रष्टाचार कोणत्या क्षेत्रात तसेच ठिकाणी होत आहे याबाबत माहिती घेत त्या क्षेत्रातील किंवा त्या ठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलनासाठी उपाययोजना केल्या जातात. तसेच प्रशासकीय कार्यपध्दती, नियम व इतर शासकीय व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचारास वाव राहू नये व त्यांचे निर्मुलन व्हावे यादृष्टीने सुलभता व पारदर्शकता आणण्याबाबत शिफारस करण्यात येते. सामान्य जनतेच्या प्रशासकीय कार्यपध्दतीबद्दल साशंकता वाटणार नाही व जनतेची कामे सहजगत्या कशी होतील याबाबत समिती मार्फत सबंधितांना सूचनाही बैठकीत देण्यात येतात.

## भारतीय सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानच्या सन्मानासाठी रक्तदान शिबीराचे आयोजन

### देशाभिमान असणाऱ्यांनी सहभागी व्हावे : उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर ' च्या माध्यमातून पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात केलेल्या धाडसी कारवाई नंतर पाकिस्तानी लष्कराने हल्ल्याची सुरुवात केली आहे. यामध्ये कर्तव्यावर असणाने काही भारतीय सैनिक शाहिद झाले आहेत. भारती सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानच्या सन्मानासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले आहे.



ऑपरेशन सिंदूर मुळे पाकिस्तान ची जगभरात नाचक्की झाली आहे. पाकिस्तान ने बुधवार पासून भारता विरोधात कारवाया चालु केल्या आहेत. पाकिस्तान चा प्रत्येक नापाकप्रयत्न भारतीय लष्कर परतवून लावत आहे. यात काही निष्पाप भारतीय नागरिकांचा व लष्करी सैनकांचा बळी गेला आहे. भारती जावनांचा उत्साह वाढवण्यासाठी, या शाहिद जवानाप्रती सहानभूती असणाऱ्या, देशाप्रती स्वाभिमान असणाऱ्यांनी या रकदान शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख उल्लास गिराम यांनी केले आहे.

सदरील रक्तदान १० मे शनिवार रोजी सकाळी ११ वाजता घेण्यास सुरुवात होईल. बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

## सप्ताहात बंकटस्वामी संस्थानने केले गरजू मुलींचे 'कन्यादान'

### बंकटस्वामी संस्थांनने संसार उपयोगी साहित्य देऊन राबविला स्तुत्य सामजिक उपक्रम

**नेकनूर । प्रतिनिधी**

क्षेत्र नेकनूर येथे प्रति वर्षा प्रमाणे महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवा निमित्त भव्य अखंड हरीनाम सप्ताहास दि ०६ वार मंगळवार रोजी प्रारंभ झाला या सप्ताह दरम्यान नेकनूर मध्ये अन्नदानासह सात दिवस भक्ती पंढरी अवतरली असून याच बरोबर श्री गुरु बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह दरम्यान



सप्ताहात बंकटस्वामी संस्थानने नेकनूर येथील भीमराव गणगे यांची भाची रेणुका राऊत या गरजू मुलींचे कन्यादान करत त्यामध्ये लग्नाचा खर्च उचलून समाज उपयोगी साहित्य देऊन कन्यादान केले आहे. हा विवाह सोहळा आणखीनही १३ मे पर्यंत सुरू राहणार असून परिसरातील इच्छुक वर वधू पित्यांनी याचा लाभ घेऊन आपल्या मुला मुलींचे विवाह सप्ताहात करण्याचे आवाहन ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे विश्वस्त व अन्नदान कमिटी, ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील महान संत वै बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवा निमित्त भव्य अखंड हरीनाम सप्ताहास मंगळवारी सुरवात झाली या सप्ताह मधे सात दिवस महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारची कीर्तने, प्रवचने, संगीत भजन, आणि संत कथा सुरू आहे या याशिवाय बंकटस्वामी संस्थान ८१ व्या पुण्यतिथीनिमित्त सप्ताहात मुलींचे कन्यादान करून संसार उपयोगी साहित्य देण्याचे जाहीर केल्यानंतर नेकनूर येथीलच भीमराव गनगे यांची ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हा क्रीडा केंद्र मार्फत सॉफ्टबॉल, बेसबॉल, मैदानी खेळाचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत राज्यतील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रची स्थापना करून केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील खेळाडूंना नियमीत स्वरूपात कीडा प्रशिक्षण देण्यात येते, त्याअनुषंगाने जिल्ह्यामध्ये क्रीडा संस्कृतीचे सर्वधन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण तयार व्हावे, तेच राष्ट्रीय व आतंरराष्ट्री स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी खेळाडूंना तंत्रशुध्द प्रशिक्षण मिळावे यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड आणि जिल्हा क्रीडा ▶▶ उर्वरित पान २ वर

